# ग्रीनलॉन्स विदयालय

**दिनांक - १-१०-२०२४ TERMINAL EXAMINATION -2024 वेळ -२ तास**

**इयत्ता - ६वी -अ,ब,क मराठी मार्क ८०**

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and Section B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet.**

## विभाग "अ" ४० मार्क

प्रश्न १ कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. किती कसबी ------------------------- आहे हा पक्षी! (हुशार,विणकर,आळशी)

२. मन आनंदाने --------------------------- नाचत होते. (थुइथुइ,भुरभुर,थुईथुई)

३. बऱ्याच दिवसांनी मुले ---------------------- झाडाजवळ आली. (वडाच्या,आंब्याच्या,निंबाच्या)

४. तिच्या हाताचा थरथरणारा स्पर्श खूप ---------------आणि बोलका होता. (प्रेमळ,खट्याळ,घाबरा)

५. नदीच्या पाण्याची --------------------------- ऐकू येऊ लागली. (खुळखुळ,खळखळ,सळसळ)

प्रश्न २अ] खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ५) (ANY 5)** [५]

१. मुलाने बाळाला मांडीवर का घेतले?

२. विजा केव्हा चमकल्या?

३. रिमाने आनंदाने उड्या का मारल्या?

४. आईच्या हातचे जेवण कसे असते?

५. घर ही कशी वास्तू आहे?

६. "पाऊस आला!पाऊस आला!" ह्या कवितेची कवी कोण आहेत?

७. आगगाडी कोणता आवाज करत चालली होती?

प्रश्न २ब] खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही २) (ANY 2)** [६]

१. मुलांना गहिवरून का आले?

२. घर व्यक्तीला काय-काय शिकवते?

३. आलेल्या पावसामुळे बाबांनी चडफड का केली?

प्रश्न २क] खालील विधाने पूर्ण करून वाक्य पुन्हा लिहा. (Rewrite the sentence) [२]

१. मामाच्या गावाला जाण्यासाठी ............................

अ) आम्ही रात्री निघालो.

ब)आम्ही सकाळी निघालो.

क) आम्ही दुपारी निघालो.

२. तिचा चेहरा ......................................

१. प्रसन्न दिसत होता.

२. उदास दिसत होता.

३. हसरा दिसत होता.

प्रश्न ३ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. [८]

शाळेच्या परिसरात असलेल्या निंबाच्या झाडावर सुगरण पक्षी घरटे बांधत होता. अतुल, नयना, जॉन व सिमरन रोज तेथे थोडावेळ थांबायचे. सुगरण पक्षी कसे घरटे बांधतो याचे निरीक्षण करायचे. त्याच्या हालचाली त्यांचे मन मोहून टाकायच्या. 'कुठे घाई नाही, गडबड नाही, सगळे कसे नियोजनबद्ध.' असे नयना नेहमी म्हणायची. तिला त्याच्या कामातला सफाईदारपणा, नीटनेटकेपणा आवडायचा. जॉनला त्याची चिकाटी तर अतुलला त्याची कष्टाळूवृत्ती भावून जायची. आपल्या सुगरणीसाठी व पिलांसाठी एवढे सुरेख घरटे बांधतो. त्यासाठी अपार मेहनत घेतो. खरंच खूपच जबाबदार व कुटुंबवत्सल पक्षी आहे हा !'

मुले घरटे पाहत असताना गुरुजी तिथे आले. गुरुजींनी मुलांना विचारले, " काय रे मुलांनो, काय पाहत आहात?" मुलांनी घरट्याकडे बोट दाखवले अन् म्हणाले, "गुरुजी, पाहा ना! सुगरण पक्ष्याने किती छान घरटे बांधले आहे." गुरुजींनी घरट्याकडे पाहिले. ते मुलांना म्हणाले, "मुलांनो, सुगरण पक्षी नीटनेटके आणि मजबूत घरटे बांधतो. गवताच्या बारीक पण चिवट काड्या गोळा करतो आणि आपल्या चोचीने सुबक व भारी घरटे विणतो. नक्षीदार वीण पाहूनच या पक्ष्याला कसबी विणकर असे म्हणतात.

अशी सुबक आकाराची सुरेख घरटी तो बांधत असतो. सुगरणमादी त्याचे निरीक्षण करते. राहण्यास योग्य व मजबूत असेल अशा घरात राहणे ती पसंत करते. निंब, बाभळीच्या झाडाच्या फांदीला हे घरटे झोक्यासारखे टांगलेले असते. वादळातही हे घरटे शाबूत राहते. गुरुजींनी सुगरण पक्ष्याची वाखाणणी केली.

प्रश्न:-

**कृती :- १** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. सुगरण पक्ष्याचे घरटे कोठे टांगलेले असते? [१]

२. पाठातील मुलांची नावे काय आहेत? [१]

**कृती :- २** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

१. नयनाला सुगरण पक्षाचे कोणते गुण आवडले? [२]

२. सुगरण पक्ष्याला कसबी विणकर का म्हणतात? [२]

**कृती :- ३** कोण-कोणास म्हणाले ते लिहा. [१]

१. “सुगरण पक्षी नीटनेटके आणि मजबूत घरटे बांधतो”

**कृती :- ४** रिकाम्या जागा भरा. [१]
१. ---------------------------------हे घरटे शाबूत राहते.
२.सुगरणमादी त्याचे ----------------------------------करते.

प्रश्न ४ खालीलपैकी कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर निबंध लिहा. **(ANY ONE)** [६]

१. माझा आवडता ऋतू

**मुददे -** ऋतूचे नाव-कोणत्या महिन्यात येतो - कोणती काळजी घ्यावी - तुम्हाला ऋतू का आवडतो.

२. माझा आवडता प्राणी

**मुददे -** कोणता प्राणी आवडतो- प्राण्याचे वर्णन - प्राण्याचे गुण - प्राण्याचा उपयोग.

३. माझे घर

**मुददे -** तुमच्या घरात कोण कोण राहतात- घराचे वर्णन - घरातील स्थान - घराबद्दल भावना

४. माझा वाढदिवस

**मुददे -** कोणत्या महिन्यात येतो - कसा साजरा करता- वाढदिवसाची आठवण.

प्रश्न ५. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. [८]

छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे लोकप्रिय राजे होते. त्यांचा जन्म कागल येथे जहागिरदार श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांच्या घराण्यात २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव व आईचे नाव राधाबाई होते. त्यांनी गोरगरिब विदयार्थ्यांसाठी वसतिगृह काढली. प्रजेच्या सुखासाठी अनेक योजना राबविल्या. त्यांना हुशार,अभ्यासू व गरीब विदयार्थ्यांविषयी फार तळमळ होती.आपल्या संस्थानात त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

एकदा वसतिगृहातील काही मुले एका रॉकेलच्या दिव्याच्या अंधुक प्रकाशामध्ये अभ्यास करत होती. तेथून छत्रपती शाहू महाराज जात होते. त्यांनी ते दृश्य पहिले. तेव्हा त्यांनी वसतिगृहातील मुलांसाठी स्टँडचे काचेचे दिवे,वात,तेल,कंदील,काडेपेटीचा पुडा इत्यादी साहित्य घेतले. मुलांच्या अभ्यासासाठी नीट व्यवस्था केली. रयतेचा राजा म्हणून आजही त्यांचे नाव अमर आहे.

प्रश्न

**कृती :- १** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.
१. शाहू महाराजांच्या आईचे नाव काय होते? [१]

२. शाहू महाराज कोणत्या संस्थानाचे राजे होते? [१]

३. महाराजांना कोणाविषयी फार तळमळ वाटत असे? [१]

**कृती :- २** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. महाराजांनी मुलांसाठी कोणकोणते साहित्य घेतले?

**कृती :- ३** रिकाम्या जागा भरा. [१]

अ] त्यांनी गोरगरिब विदयार्थ्यांसाठी ---------------------------------- काढली.

आ] आपल्या संस्थानात त्यांनी ------------------------------- विवाहाला मान्यता दिली.

**कृती :- ४** खालील दिलेल्या चौकटीतून योग्य समानार्थी शब्द लिहा. [१]

(बंगला, सदन, माता)

१. आई - --------------------------------------- २. घर - -------------------------------------

**कृती :- ५** खालील दिलेल्या चौकटीतून योग्य विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

(प्रकाश, दुःख, विदयार्थी, श्रीमंत)

१. गरिब - ------------------------------------ २. अंधार - ----------------------------------------

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

**नाव -** ------------------------------------------------------------ **हजेरी क्र.**---------------- **इयत्ता - ६ - अ,ब,क**

## विभाग "ब" ४० मार्क

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहा. **(कोणतेही ५) (ANY 5)** [५]

१. टुकुटुकु पाहणे - ------------------------------------------------------------

२. शाबूत राहणे - ------------------------------------------------------------

३. जवळ करणे - ------------------------------------------------------------

४. वाखाणणी करणे - ------------------------------------------------------------

५. सर येणे - ------------------------------------------------------------

६. खुदकन हसणे - ------------------------------------------------------------

प्रश्न २अ] खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. त्या मुलांशी विक्रमची मैत्री जमली.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------------------

२. राधा घरात खेळत होती.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------------------

३. राधा खूप गरीब होती.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------------------

प्रश्न २ब] खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [३]

१. रामराव कोठे निघालात? उत्तर - सर्वनाम - ---------------------------------------------------

२. आपण सर्व एकत्र जेवायला बसू. उत्तर - सर्वनाम - ---------------------------------------------------

३. मी जे सांगेन तेच कर. उत्तर - सर्वनाम - ---------------------------------------------------

प्रश्न २क]खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. बाजारात ताजी भाजी होती.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - -------------------------------------------

२. ती इमारत दूर आहे.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ---------------------------------------------

३. भूषणने दुकानदाराला पाचशे रुपये दिले.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ---------------------------------------------

प्रश्न ३अ] खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

(नशीब, काक, काळोख, बायको, पाषाण, ममता, समुद्र)

१. पत्नी - ---------------------------------------- २. सागर - ---------------------------------------------

३. भाग्य - ---------------------------------------- ४. अंधार - ---------------------------------------------

५. माया - ---------------------------------------- ६. कावळा - ---------------------------------------------

प्रश्न २ब] खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

(खोटे, पुण्य, निरोगी, सोपे, मूर्ख, अपकीर्ती, शाप)

१. हुशार X ---------------------------------------- २. खरे X ---------------------------------------------

३. अवघड X ---------------------------------------- ४. पाप X ---------------------------------------------

५. कीर्ती X ---------------------------------------- ६. रोगी X ---------------------------------------------

प्रश्न ३क] खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. मुददा - ---------------------------------------- २. फेरा - ---------------------------------------------

३. धाप - ---------------------------------------- ४. महाराणी - ---------------------------------------------

५. लिपी - ---------------------------------------- ६. नाटक - ---------------------------------------------

प्रश्न ३ड] खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. मामा - ---------------------------------------- २. सखा - ---------------------------------------------

३. नोकर - ---------------------------------------- ४. बादशहा - ---------------------------------------------

५. वर - ---------------------------------------- ६. शेतकरी - ---------------------------------------------

प्रश्न अ] खालील शब्दांचे अर्थ लिहा. [४]

१. वास्तू - ---------------------------------------- २. सायंकाळ - ---------------------------------------------

३. मजबूत - ---------------------------------------- ४. घोटाळा - ---------------------------------------------

प्रश्न ४ब] खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [४]

१. जिव्हाळा,जीव्हाळा,जिव्हाला,जीवाला - ------------------------------------------------------------------

२. गपिस्ट,गपिष्ट,गापिस्ट,गपिष्ठ - ------------------------------------------------------------------------------

३. कुटुंबसंल,कुटूंबवत्सल,कुटुम्बवत्सल,कुटुंबवत्सल - ---------------------------------------------------

४. किलबिल,किलबील,किल्बिल,किलबिला - --------------------------------------------------------------

प्रश्न ४क] खालील शब्दांपासून वाक्य तयार करा. [३]

१. कहाणी (story) - ------------------------------------------------------------------------------------------------------

२. मजा (fun) - -------------------------------------------------------------------------------------------------------------

३. शाळा (school) - ----------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ५ खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.**(कोणतेही १) (ANY 1)** [३]

१. पाऊस आला! पाऊस आला!

ऐन ------------------------- विजा --------------------------------

------------------------कडकड --------------------------- वारा

----------------------- --------------------------------- गारा,गारा.

**OR**

२. घरात ------------------- अपार ------------------------

------------------ सांगते ------------------------------- गोष्ट

घरात ---------------------------, ------------------------------

--------------------------- हातचे --------------------- चविष्ट